## प्रेस नोट दि. २१/०६/२०२०

### १ देशी बनावटीचे पिस्टल व २ जिवंत राऊंड विक्री करण्याकरीता बाळगणारे एक इसमाकडून ८३,०००/- रू चा मुददेमाल जप्त तसेच दुस-या कारवाईमध्ये वेगवेगळया दोन दरोडया च्या गुन्हयात २ वर्षापासून फरार असलेल्या आरोपीस पकडले.

दि २१/०६/२०२० रोजी मा वरिष्ठांचे आदेशान्वये सहा पोलीस निरीक्षक श्री राम गोमारे व गुन्हे शाखा, युनिट ५ कडील पोलीस कर्मचारी हे खासगी चारचाकी वाहनाने पेट्रोलींग करीत असताना **पोलीस कर्मचारी धनंजय भोसले** यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एक इसम पांढरे रंगाची ॲक्टीव्हा गाडी क्र एम एच १४ एफ एच ७२४६ या दुचाकी वरून मुकाई चौक येथुन सेंट्रल चौक देहुरोड येथे त्याचेकडे असलेले देशी बनावटीचे पिस्टल विक्रीकरीता येणार असुन त्याने अंगामध्ये निळे रंगाचा जर्कीण व निळया रंगाची जिन्स पॅन्ट घातलेली आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने सहा पोलीस निरीक्षक श्री राम गोमारे यांनी सोबतचे कर्मचारी यांना सुचना देवून त्यांच्या दोन टिम तयार करुन सापळा लावला. काही वेळाने वरील वर्णनाप्रमाणे एक इसम त्याच्याकडील पांढरे रंगाची ॲक्टीव्हा गाडी क्र एम एच १४ एफ एच ७२४६ यावरून येवून तो पुणेरी मिसळ हाऊसच्या समोर सेंट्रल चौक येथे येवुन त्याची गाडी कडेला लावून कोणाचीतरी वाट पाहत थांबला. त्याला पोलीसांचा सुगावा लागताच तो गाडी चालू करून पळुन जाण्याचा प्रयत्न करीत असताना त्याला पोलीस स्टाफचे मदतीने शिताफीने ताब्यात घेवून नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव शुभम गोविंद झगडे, वय १९ वर्षे धंदा मजुरी रा मु.पो. शेरी कोरेगाव भिमा जवळ, पाबळ ता शिरूर जि पुणे असे असल्याचे सांगितले. त्याचेकडे चौकशी करीत असताना तो घाबरुन उडवउडवीची उत्तरे देवु लागल्याने आम्हास त्याचा अधिक संशय आल्याने त्याची पंचांसमक्ष अंगझडती घेतली असता त्याचे कमरेस डावे बाजुस पॅन्टमध्ये खोचलेले एक देशी बनावटीचे पांढरे रंगाचे पिस्टल मॅक्झीनसह मिळुन आले, डावे खिश्यामध्ये दोन जिवंत काडतुसे मिळुन आले. मिळुन आलेले पिस्टल व जिवंत काडतुस जवळ बाळगण्याचा परवाना आहे अगर कसे या बाबत विचारणा केली असता त्यांनी प्रथम उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली त्याला गुन्हे शाखा, युनिट ५ कार्यालय येथे नेवून सखोल तपास करता त्याने त्याचेकडे कोणत्याही प्रकारचा अग्निशस्त्र बाळगण्याचा परवाना नसल्याचे सांगुन सदर पिस्टल व जिवंत काडतुस हि विक्री करण्याकरीता आणल्याचे सांगितले. सदर आरोपी याच्यावर देहुरोड पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे.

तसेच दुस-या कारवाई मध्ये मा. पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई सो यांनी गुन्हयातील पाहीजे व फरारी आरोपी पकडण्यासाठी गुन्हे शाखेस विशेष मोहीम राबविण्यास आदेशीत केले होते त्याप्रमाणे दि. २०/०६/२०२० रोजी गुन्हे शाखा युनीट ५ कडील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री राम गोमारे व स्टाफ हे पाहीजे आरोपी शोधत असताना पो ना फारूक मुल्ला यांना देहुरोड पोलीस स्टेशन गु र नं ६०२/२०१८ भादवि कलम ३९५ प्रमाणे दाखल गुन्हयातील आरोपी नामे ऋतीक श्रीपती सुर्यवंशी वय २२ रा राजनगर निगडी हा आझाद चौक येथे त्याच्या मित्राला भेटण्यासाठी येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्यास आझाद चौक, निगडी येथून शिताफीने पकडले असून सदर आरोपी हा गेली दोन वर्षापासून अटक टाळण्यासाठी पोलीसांना गुंगारा देत होता.

तसेच दि.२०/०६/२०२० रोजी गुन्हे शाखा युनीट ५ कडील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री राम गोमारे व स्टाफ हे पाहीजे आरोपी शोधत असताना पो ना नितीन बहीरट यांना देहुरोड पोलीस स्टेशन गु र नं १०६७/२०१९ भादवि कलम ३९५ प्रमाणे दाखल गुन्हयातील आरोपी नामे दिनेश उमापती हेगडे वय २० रा शितळानगर देहुरोड पुणे हा आरोपी कुणाल हॉटेल जवळ शितळानगर देहुरोड येथे येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्यास कुणाल हॉटेल जवळ शितळानगर देहुरोड येथून शिताफीने पकडले असून दोन्ही आरोपीस पुढील कारवाईकरीता देहुरोड पोलीस स्टेशन यांच्या कडे देण्यात आले आहे. सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उपआयुक्त गुन्हे मा. श्री सुधिर हिरेमठ, सहा पोलीस आयुक्त गुन्हे मा. श्री राजाराम पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट-५ चे पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत, सहा पोलीस निरीक्षक श्री राम गोमारे व पोलीस कर्मचारी ज्ञानेश्वर गाडेकर, मयुर वाडकर, दत्तात्रय बनसुडे, दयानंद खेडकर, फारुक मुल्ला, संदिप ठाकरे, धनराज किरनाळे, गणेश मालुसरे, सावन राठोड, धनंजय भोसले, स्वामीनाथ जाधव, भरत माने, नितीन बहिरट, राजकुमार इघारे, श्यामसुंदर गुट्टे, गोपाळ ब्रम्हांदे, राजेंद्र शेटे व नागेश माळी यांनी केली आहे.